राज्यातील दूध उत्पादकांना शासनामार्फत करण्यात येणा-या दूध खरेदी दरात वाढ, शासकीय दूधाच्या विक्री दरात वाढ व सहकारी दूध संघ / संस्था यांच्या कमिशनमध्ये वाढ करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक एमएलके-२०११/प्र.क्र. १९१ /पदुम-८
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- २५ ऑगस्ट, २०११.

वाचा : १) शासन निर्णय,कृषि व पदुम विभाग क्रमांक एमएलके २०११/प्र.क्र. १९/पदुम-८, दिनांक ४ फेब्रुवारी, २०११
२) शासन निर्णय क्रमांक एमएलके २०११/प्र.क्र. १८३ /पदुम-८, दिनांक ७ जुलै, २०११.

**प्रस्तावना :**

राज्यातील दूध संकलन शासन, सहकार व खाजगी क्षेत्रामार्फत होत असल्याने दूध खरेदी दरात बाजारातील चढ-उतार लक्षात घेऊन काही दूध संघ व बहुतेक खाजगी प्रकल्प दूध खरेदी दरात बदल करुन त्यांच्याकडील दूध संकलन नियंत्रित करीत असते. परिणामी शासनाकडे होणा-या दूध पुरवठयावर परिणाम होऊन शासनाकडील दूध वितरण व उत्पादन यामध्ये नियोजन राखणे शक्य होत नाही. त्यासाठी ज्या प्रमाणात खुल्या बाजारात दूध खरेदीचे दर असतील त्याच्या आसपास शासनाचे दूध खरेदी दर असणे आवश्यक आहे. मा.सचिव (पदुम) यांच्या अध्यक्षतेखाली प्रदत्त समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. राज्यातील सद्यस्थितीतील दूध खरेदी दर, उत्पादन खर्च इ.बाबींचा आढावा घेऊन नविन दर निश्चित करण्याबाबत प्रदत्त समितीच्या दि. २०/७/२०११ रोजी झालेल्या बैठकीत विचार करण्यात आला. त्यानुसार शासनाच्या दुधाचे खरेदी व विक्री दर वाढविण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. त्यानुसार दुधाचे खरेदी व विक्री दर वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :**

शासनामार्फत खरेदी करण्यात येणा-या गाय / म्हैस दुधाचे सुधारीत दरात पुढीलप्रमाणे वाढ करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.
१) ३.५/८.५% गुणप्रतीच्या गाय दूध खरेदीसाठी दूध उत्पादक शेतक-यांना प्रतिलिटर रु.१६/- हा दर दिला जातो तो रु. १/- ने वाढून रु.१७/- एवढा करण्यात येत आहे.
२) ६.०/९.०% गुणप्रतीच्या म्हैस दूध खरेदीसाठी दूध उत्पादक शेतक-यांना प्रतिलिटर रु. २३/- हा दर दिला जातो तो रु.२/- ने वाढून रु. २५/- एवढा करण्यात येत आहे.
३) राज्यातील सहकारी संस्था / संघ / बहुराज्यातीय संघ / एमएमपीओ नोंदणीकृत प्रकल्पाचे दूध खरेदी करताना प्रतिलिटर रु. २.४० एवढे कमिशन दिले जाते. सदर कमिशनमध्ये रु. ०.५० एवढी वाढ करुन ते रु. २.९० करण्यात आहे.
२. गाय / म्हैस दूध खरेदी करताना गुणप्रती नुसार खरेदी करण्यात येणा-या दुधाचे दर पुढीलप्रमाणे राहतील.

## गाय व म्हैस दूध खरेदी दराचा तक्ता

| गाय दूध | | म्हैस दूध | |
|---|---|---|---|
| गुणप्रत | खरेदी दर प्र.लि.(रु.) | गुणप्रत | खरेदी दर प्र.लि.(रु.) |
| ३.५ / ८.५ | १७.०० | ६.० / ९.० | २५.०० |
| ३.६ / ८.५ | १७.२० | ६.१ / ९.० | २५.३० |
| ३.७ / ८.५ | १७.४० | ६.२ / ९.० | २५.६० |
| ३.८ / ८.५ | १७.६० | ६.३ / ९.० | २५.९० |
| ३.९ / ८.५ | १७.८० | ६.४ / ९.० | २६.२० |
| ४.० / ८.५ | १८.०० | ६.५ / ९.० | २६.५० |
| ४.१ / ८.५ | १८.२० | ६.६ / ९.० | २६.८० |
| ४.२ / ८.५ | १८.४० | ६.७ / ९.० | २७.१० |
| ४.३ / ८.५ | १८.६० | ६.८ / ९.० | २७.४० |
| ४.४ / ८.५ | १८.८० | ६.९/ ९.० | २७.७० |
| ४.५ / ८.५ | १९.०० | ७.० / ९.० | २८.०० |
| ४.६ / ८.५ | १९.२० | ७.१ / ९.० | २८.३० |
| ४.७ / ८.५ | १९.४० | ७.२ / ९.० | २८.६० |
| ४.८ / ८.५ | १९.६० | ७.३ / ९.० | २८.९० |
| ४.९ / ८.५ | १९.८० | ७.४ / ९.० | २९.२० |
| ५.० / ८.५ | २०.०० | ७.५/ ९.० | २९.५० |

### ३. शासकीय दुधाचे विक्री दराबाबत

शासकीय दूध योजनांमार्फत बृहन्मुंबई दूध योजना व ग्रामिण योजनांमार्फत होणा-या दूध विक्रीसाठी गाय दूध आणि टोण्ड दूध विक्री दरात प्रति लि.रु.१.५० ने वाढ करण्यात येत आहे त्याचप्रमाणे म्हैस दूध व फुल क्रिम दुधासाठी प्र.लि.रु. ३/- ने वाढ करण्यात येत आहे. त्यानुसार शासकीय दूध योजनांमार्फत विक्री होणा-या पिशवीबंद दुधाचे दर पुढीलप्रमाणे राहतील.

| अ.क्र. | योजना | दुधाचा प्रकार | सध्याचा विक्री दर प्र.लि. (रु.) | सुधारीत विक्री दर प्र.लि.(रु.) | सुधारीत विक्री दर अर्धा लि.साठी |
|---|---|---|---|---|---|
| १ | बृ.मु.दू.यो. | गाय दूध | २७.५० | २९.०० | १४.५० |
| | ग्रामिण योजना | गाय दूध | २६.५० | २८.०० | १४.०० |
| २ | बृ.मु.दू.यो. | म्हैस दूध | ३४.०० | ३७.०० | १८.५० |
| | ग्रामिण योजना | म्हैस दूध | ३३.०० | ३६.०० | १८.०० |
| ३ | बृ.मु.दू.यो. | फूल क्रिम दूध | ३४.०० | ३७.०० | १८.५० |
| | ग्रामिण योजना | फूल क्रिम दूध | ३३.०० | ३६.०० | १८.०० |
| ४ | बृ.मु.दू.यो. | टोण्ड दूध | २६.५० | २८.०० | १४.०० |
| | ग्रामिण योजना | टोण्ड दूध | २५.५० | २७.०० | १३.५० |

४. हे आदेश दिनांक १ सप्टेंबर, २०११ पासून अंमलात येतील.

हे आदेश प्रदत्त समितीच्या बैठकीत गाय / म्हैस दूध खरेदी दरात व विक्री दरात वाढ करण्या बाबत शिफारस केल्यानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(म.ता. कांबळे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन,
कृषि, पशुसवंर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

प्रति,

आयुक्त दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई-४०० ०१८
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंध मर्या. गोरेगांव, मुंबई
महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दूध योजना, वरळी, मुंबई-४०० ०१८
प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, पुणे/ नागपूर/ मुंबई/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती
सर्व जिल्हा दुग्धविकास अधिकारी
सर्व महाव्यवस्थापक/ व्यवस्थापक, शासकीय दूध योजना
महालेखापाल १/२, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा), मुंबई/ नागपूर
अधिदान व लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग (व्यय-२)
सर्व कार्यासने (पदुम विभाग)
निवड नस्ती